# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 08 August 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज द्वैमासिक परधोरण आढावा जाहीर केला. बँकेनं रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवला असल्याचं त्यांनी सांगितलं. महागाई मोठ्या प्रमाणावर घसरत असल्याचं सांगून दास यांनी, महागाई दर सुनिश्चित करण्यासाठी स्थायी ठेवींचा दर सहा दशांश पंचवीस टक्के ठेवण्यात आला असल्याचं सांगितलं.

****

राज्यसभेत आज विरोधकांनी कुस्तीपटू विनेश फोगाटला ऑलिम्पिक स्पर्धेतून अपात्र केल्याचा मुद्दा उपस्थित करत गदारोळ केला. आज कामकाज सुरु होताच विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी हा मुद्दा उपस्थित केला, मात्र सभापतींनी त्यांना परवानगी नाकारल्यानं विरोधकांनी सभात्याग केला.

विनेश फोगाटसंदर्भातला मुद्दा हा कोणत्याही पक्षाचा किंवा सत्ताधारी आणि विरोधकांचा नाही तर देशासमोरील मुद्दा आहे. संपूर्ण देश विनेशच्या मागे उभा आहे, त्यामुळे या प्रकरणी विरोधकांनी राजकारण करू नये, असं केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी म्हटलं आहे.

****

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचं आज कोलकाता इथं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. २००० ते २०११ असे तब्बल ११ वर्षा त्यांनी पश्चिम बंगालचं मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं.

****

रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या मराठवाडा उपकेंद्राच्या उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं आहे. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. जालना इथल्या

उपकेंद्राच्या पदनिर्मितीस मान्यता आणि मूल्यनिर्धारण अहवालानुसार संस्थेस देय असलेली वेतन अनुदानाची रक्कम देण्यासंदर्भातही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असंही पाटील यांनी यावेळी सांगितलं.

****

चंद्रयान तीन यशस्वी मोहिमेच्या स्मरणार्थ केंद्र सरकारतर्फे २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. याच्या पूर्वतयारीचा भाग असलेल्या 'टचिंग द मून व्हाईल टचिंग द लाईव्हस – इंडियाज् स्पेस सागा' या एक दिवसीय कार्यशाळेचं आज नागपूर इथं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था –व्ही एन आय टी संस्थेद्वारे आयोजित या कार्यशाळेचं उद्घाटन चांद्रयान तीन चे प्रकल्प संचालक डॉ. पी. वीरमुथुवेल यांच्या हस्ते झालं. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये चांद्रयान मिशन, अंतराळ तंत्रज्ञानाचे सामाजिक परिणाम या विषयावर चर्चासत्र तसंच विद्यार्थ्यांचा अंतराळ वैज्ञानिकांसोबत संवाद आदी कार्यक्रम होणार आहेत.

****

महसूल पंधरवाडानिमित्त परभणी जिल्ह्यात पालम इथं काल अपर जिल्हाधिकारी प्रताप काळे यांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, यासह इतरही विविध महत्वाकांक्षी योजनांचे लाभार्थी यावेळी उपस्थित होते.

****

शिक्षण आणि समाजसेवा कार्यात उल्लेखनीय योगदान देत असल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर इथल्या ओंकार विद्यालयाला 'श्रद्धेय दत्ताजी डिडोळकर शिक्षण पुरस्काराने' सन्मानित करण्यात आलं. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संस्थापक दत्ताजी डिडोळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा समारोप कार्यक्रम काल नागपूर इथं पार पडला, त्यावेळी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजीव सावजी यांना हा पुरस्कार प्रदान केला. एक लाख रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

जालना जिल्ह्यात दुधातील भेसळ रोखण्यासाठी तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश, जिल्हास्तरीय दूध भेसळ समितीच्या अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी दिले आहेत. दरम्यान, दूध भेसळ रोखण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील दूध

आणि दुग्धजन्य पदार्थांचे एकूण ४४ नमुने घेण्यात आले असून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी तीन नमुने कमी दर्जाचे आले असल्यानं संबंधितांवर दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता आहे.

****

लातूर जिल्ह्यातल्या सर्व विधानसभा मतदार संघातल्या मतदारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त कार्यक्रमांतर्गत दावे आणि हरकती स्वीकारण्यासाठी १०, ११, १७ आणि १८ ऑगस्ट रोजी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातल्या सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आलं आहे.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आज भालाफेकपटू निरज चोप्रा सुवर्ण पदकासाठी खेळणार आहे. रात्री १२ वाजता या स्पर्धेला सुरुवात होईल. हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाचा आज कांस्य पदकासाठीचा सामना स्पेन सोबत होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे पाच वाजता या सामन्याला सुरुवात होईल. कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सहरावत याचा, तर महिलांच्या ७५ किलो वजनी गटात अंशुचा सामना होणार आहे.

****